जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2020
तरूण भारत



# प्रदूषणमुक्त दीपोत्सव साजरा करा

दिपवाळी हा सण अंधारातून प्रकाशाकडे जाणारा आहे. पणत्या अंधारातही वेगळे सौंदर्य व प्रकाश घेऊन येतात. त्यामुळे सर्व करवीरवासियांनी दिवे आणि रोशनाईवर भर द्यावा. एका एजन्सीच्या अभ्यासाअंती कोल्हापूरचे प्रदुषण वाढल्याचे स्पष्ट झाले आहे, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके न वाजवता दिवे लावावे. कोरोनाचा संसर्ग कमी झाला ही चांगली गोष्ट आहे. परंतू गर्दीमुळे संसर्ग वाढू नये म्हणून लोकांनी घरातून बाहेर पडू नये. यापूर्वी गणेशोत्सवासह इतर सण साधेपणाने साजरे केले आहेत. त्याप्रमाणे दीवाळी साध्या पध्दतीने आनंदाने साजरी करावी. करवीरवासियांना दिवाळी आनंदाची, सौख्याची, आरोग्यदायी जावो.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 NOV 2020

लोकमत

# व्यवस्थेतील सुधारणेसाठी माध्यमांनी कान टोचणे आवश्यक

## शैलेश बलकवडे : 'लोकमत-दीपोत्सव' दिवाळी अंकाचे प्रकाशन ; कुलगुरु डी. टी. शिर्के यांची उपस्थिती

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोणत्याही व्यवस्थेतील सुधारणेसाठी प्रसारमाध्यमांनी कान टोचणे आवश्यक आहे. ती भूमिका बजाविण्यात 'लोकमत' अग्रस्थानी आहे. प्रशासन, शिक्षण, आदी विविध क्षेत्रांमध्ये विधायक दिशा देण्याचे काम करणारा 'लोकमत' आमच्यासाठी अविभाज्य घटक बनला आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

वाचकांसाठी नव्या अनुभवांचे दार उघडणाऱ्या 'लोकमत'च्या दीपोत्सव या दिवाळी अंकाचे प्रकाशन जिल्हा पोलीस अधीक्षक बलकवडे आणि कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते 'लोकमत'च्या शहर कार्यालयात झाले. 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख यांनी स्वागत केले.

### स्पर्धा परीक्षेस उपयुक्त

स्पर्धा परीक्षा तयारीसाठी आवश्यक स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवरील विविध विषयांची सखोल माहिती 'लोकमत'मधून मिळते. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यापासून माझी 'लोकमत' समवेत नाळ जुळली. ती आजही कायम असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक बलकवडे यांनी सांगितले.

संपादक वसंत भोसले यांनी प्रास्ताविक केले. समाजाचे प्रश्न, समस्या समजून घेऊन ते सोडविण्याची 'लोकमत'ची भूमिका आहे. जे चांगले आहे, त्यास बळ देणे आणि चुकीचे घडत असेल, तर प्रहार करणे ही 'लोकमत'च्या पत्रकारितेची दिशा असल्याचे संपादक भोसले यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक बलकवडे म्हणाले, पोलीस हा समाजाचा घटक आहे. पोलीस विभागाची प्रतिमा मलीन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्याच्यादृष्टीने नियोजन करण्यात येईल. विविध स्वरूपातील कारवाईबाबत समाजाच्या जशा पोलिसांकडून अपेक्षा आहेत, तसेच समाजानेही कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी 'लोकमत'ने बळ दिले आहे. कुलगुरूपदाच्या जबाबदारीची जाणीवही करून दिली. कोल्हापूरचे पहिले कुलगुरू होण्याचा मान मिळाल्याने माझी जबाबदारी वाढली आहे. कोल्हापूरला साजेसे काम करीन, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिली. यावेळी 'लोकमत'चे जाहिरात व्यवस्थापक विवेक चौगुले, मनुष्यबळ व प्रशासन विभागाचे व्यवस्थापक संतोष साखरे, मुख्य बातमीदार विश्वास पाटील उपस्थित होते.



कोल्हापुरात गुरुवारी 'लोकमत-दीपोत्सव'चे प्रकाशन जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी 'लोकमत'चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख, संपादक वसंत भोसले उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

13 NOV 2020

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सकाळ'ची आरोग्यदायी दिवाळी भेट

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'स्वास्थ्य-आरोग्यम् धनसंपदा' दिवाळी अंकाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १२ : बदलती जीवनशैली आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आता प्रत्येकालाच सर्वांगीण आरोग्यावर भर द्यावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर 'सकाळ'ने एक अनोखी आरोग्यदायी दिवाळी भेट साऱ्यांना दिली असून ती सर्वच वयोगटांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. 'सकाळ'च्या 'स्वास्थ्य- आरोग्यम् धनसंपदा' या दिवाळी अंकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगर येथील मुख्य कार्यालयात कोरोना प्रतिबंधात्मक नियम पाळत हा सोहळा सजला.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "सध्याच्या स्पर्धेच्या जगात आहाराबाबतच्या सवयी बदलत चालल्या असल्याने आरोग्याच्या विविध तक्रारींना अगदी कमी वयात सामोरे जावे लागते आहे; मात्र सकस आहार, योग्य व्यायाम आणि तणावमुक्तीतून सुदृढ आरोग्य प्रत्येकाला शक्य आहे. त्यासाठी 'सकाळ'चा दिवाळी अंक प्रत्येकाला आरोग्य गुरू म्हणून सतत मार्गदर्शक ठरणार आहे."

सकाळ माध्यम समूहाचे संपादक-संचालक श्रीराम पवार म्हणाले, "दिवाळी अंकांना मराठी संस्कृतीत मोठी परंपरा आहे आणि सकाळ माध्यम समूहाने या क्षेत्रातही नेहमीच वेगळा ठसा उमटवला आहे. सध्याच्या कोरोनाच्या काळात माणसाला सर्वच पातळीवर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते आहे. मात्र, त्यातही आरोग्याबाबत मोठ्या प्रमाणावर आता जागरुकता वाढू लागली आहे. प्रचंड झपाट्याने विस्तारणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील बदलते प्रवाह, अत्याधुनिक तंत्रज्ञानाबरोबर या क्षेत्राचा सर्वांगीण वेध दिवाळी अंकातून घेण्यात आला आहे."

### भविष्याचाही वेध...

जगभरातील पारंपरिक उपचार पद्धतींबरोबरच झपाट्याने विकसित होणाऱ्या वैद्यकीय क्षेत्राचा वेध घेताना भविष्यात हे क्षेत्र कसे असेल, यावरही या अंकातून मंथन झाले आहे. नामांकित तज्ज्ञांचे लेख सर्वच वयोगटांसाठी मार्गदर्शक असून दिवाळी अंक नोंदणीसाठी या क्रमांकावर संपर्क साधा - ९६२३५३३५४७

लेखक डॉ. विक्रम राजाज्ञा म्हणाले, "आरोग्याची काळजी प्रत्येकाने घेणे सध्या गरजेचे बनले आहे. 'सकाळ' समाजहितासाठी नेहमीच अग्रेसर राहिला असून, दिवाळी अंकाच्या माध्यमातूनही ही परंपरा कायम ठेवली गेली आहे."

प्रसिद्ध दुर्गअभ्यासक डॉ. अमर अडके म्हणाले, "कोरोनोत्तर काळात आता प्रत्येकाला आपल्या आरोग्याविषयीची खबरदारी महत्त्वाची वाटू लागली आहे. या पार्श्वभूमीवर 'सकाळ'चा दिवाळी अंक सर्वच वयोगटांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे."

निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी नेहमीच दर्जेदार दिवाळी अंक वाचकांना देण्याची परंपरा 'सकाळ'ने यंदाही कायम ठेवली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात मुख्य व्यवस्थापक (जाहिरात) आनंद शेळके, 'सकाळ'चे सहसंपादक प्रसाद इनामदार, उपसंपादक सुजित पाटील, सुगंध मारुलकर, मनोज पाटील यांचा या वेळी सत्कार झाला. 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, वरिष्ठ व्यवस्थापक (वितरण) महेश डाकरे, शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. मुख्य बातमीदार निवास चौगले यांनी स्वागत केले.




**कोल्हापूर : 'सकाळ-कोल्हापूर'च्या 'स्वास्थ्य आरोग्यम् धनसंपदा'या दिवाळी अंकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी डावीकडून 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, डॉ. अमर अडके, सकाळ माध्यम समूहाचे संपादक-संचालक श्रीराम पवार, कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. विक्रम राजाज्ञा, 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव.** (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2020
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाने घेतल्या ११ दिवसांत १७२ परीक्षा

## अंतिम वर्षाच्या परीक्षा निर्विघ्नपणे पूर्ण

■ संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने अकरा दिवसांत (सुटी वगळून) विविध विद्याशाखांच्या अंतिम सत्र, वर्षाच्या १७२ परीक्षा विनाअडचण पूर्ण घेतल्या आहेत. त्यांसह १४५ परीक्षांचे निकालही जाहीर केले. राज्यातील अन्य काही विद्यापीठांच्या ऑनलाईन परीक्षांत विविध अडचणी उद्‌भवल्या. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांबाबत काय होणार याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले होते. अशा स्थितीत मात्र, या विद्यापीठाने निर्विघ्नपणे परीक्षा पार पाडून राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाने अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षा दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू केल्या. त्यात कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश होता. या परीक्षा दि. १० ऑक्टोबरला पूर्ण झाल्या. या परीक्षांसाठी एकूण ७१७६५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. त्यांपैकी ७००८८ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा दिली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गुरुवारपर्यंत विविध १४५ परीक्षांचे निकाल जाहीर केले. परीक्षेची तयारी करताना समोर आलेली प्रत्येक अडचण समजून घेऊन ती सोडविण्याचे नियोजन केल्याने निर्धारित वेळेत आणि विनाअडथळा परीक्षा घेण्यात विद्यापीठ यशस्वी ठरले.

> संभाव्य अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या; त्यामुळे अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षा विनाअडथळा पूर्ण झाल्या. त्याचे श्रेय परीक्षा मंडळ, संगणक केंद्र, विविध समित्यांमधील अधिकारी, सदस्य, कर्मचाऱ्यांचे आहे.
>
> - **डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### वॉररूम, विद्यार्थ्यांना माहिती

ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षांच्या स्वरूपाची मॉकटेस्टसह अन्य स्वरूपात माहिती दिली. परीक्षा कामातील शिक्षक, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. परीक्षा कालावधीत अडचणी उद्‌भवल्यास त्या सोडविण्यासाठी वॉररूम कार्यान्वित केली. त्याचा उपयोग परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यात झाल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

### विद्यापीठाने काय केले

- ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षांतील संभाव्य अडचणींचा परीक्षांपूर्वी अभ्यास केला.
- या अडचणी उद्‌भवू नयेत या दृष्टीने उपाययोजना, तयारी केली.
- टप्प्याटप्प्याने दिवसागणिक परीक्षांची संख्या वाढविली.
- कमी विद्यार्थिसंख्येच्या परीक्षा शेवटच्या टप्प्यात घेतल्या.

**आकडेवारी दृष्टिक्षेपात**

| ४६८०० | २३२८८ | १६५ |
|---|---|---|
| (नोंदणी- ४७७६५) ऑनलाईन परीक्षा दिलेले विद्यार्थी | (नोंदणी- २४००९) ऑफलाईन परीक्षा दिलेले विद्यार्थी | प्रश्नपत्रिकांची एकूण संख्या |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2020
तरुण भारत

# तंत्रज्ञान, अधिविभागात होणार ५२ प्राध्यापकांची भरती

- व्यवस्थापन परीषदेच्या विद्यापीठ प्रशासनाला अहवाल सादर करण्याच्या सूचना
- व्यवस्थापन परीषदेची बैठक संपन्न

**कोल्हापूर :** तंत्रज्ञान अधिविभागामध्ये सहयोगी, सहाय्यक प्राध्यापकांच्या एकूण ५२ पदांची भरती केली जाणार आहे. त्याबाबतचा अहवाल आस्थापना विभागाने सादर करावा अशी सूचना व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ प्रशासनाला केली आहे. नुकतीच शिवाजी विद्यापठामध्ये व्यवस्थापन परिषदेची बैठक पार पडली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी या परिषदेतील सदस्यांनी विद्यापीठाच्या विकासाबाबतच्या प्रत्येक सदस्यांनी त्यांच्या संकल्पना, योजनांचा समावेश असणारे व्हीजन सादर करावे, असे आवाहन केले आहे. त्यानुसार या परिषदेतील सदस्य हे विद्यापीठाबाबतचे आपआपले व्हीजन बुधवारी २५ नोव्हेंबरच्या बैठकीमध्ये सादर करणार आहेत. तंत्रज्ञान अधिविभागामध्ये सहयोगी, सहाय्यक प्राध्यापकांच्या एकूण ५२ पदांची भरती केली जाणार आहे. त्याबाबतचा अहवाल आस्थापना विभागाने सादर करावी, अशी सूचना या परिषदेने विद्यापीठ प्रशासनाला केली आहे. विविध विद्याशाखांच्या सत्रारंभ, सत्रसमाप्तीच्या सुधारित तारखांना मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2020
लोकमत

# 'एटीकेटी' विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत निर्णय घ्या

■ लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** प्रथम, द्वितीय वर्षातील एटीकेटी, बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत शिवाजी विद्यापीठाने लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समितीने बुधवारी केली. त्याबाबतचे निवेदन या समितीच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले.

अंतिम वर्ष, सत्रातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा झाल्या. मात्र, प्रथम, द्वितीय वर्षातील एटीकेटी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समाज न्यायाच्या तत्त्वावर परीक्षा आयोजित केल्या जातील, अशी अपेक्षा होती. मात्र, त्याबाबत विद्यापीठाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. नागपूर, सोलापूर, मुंबई विद्यापीठाने एटीकेटी बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने याबाबत त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समितीच्यावतीने या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या समितीच्या शिष्टमंडळात मंदार पाटील, ऋतुराज माने, राजवर्धन बिरंजे, पार्थ पाटील, वरुण जेरे, धनंजय बच्चे, सिद्धांत गुडाळे यांचा समावेश होता.

## जिम्मेदारी शिवाजी विवि के प्र-कुलगुरु बने

# डॉ. पाटिल ने संभाला पद



नवभारत न्यूज नेटवर्क

**कोल्हापुर.** शिवाजी विश्वविद्यालय के सातवें प्र-कुलगुरु के तौर पर प्रा. डॉ. पी. एस. पाटिल की नियुक्ति की गई थी. उन्होंने हाल ही में अपने पद को स्वीकार किया. सादगी से भरे कार्यक्रम में डॉ. पाटिल ने विश्वविद्यालय के अधिकारी और करीबी परिजनों की उपस्थिति में पद ग्रहण किया.

## महान विभूतियों का अभिवादन किया

शिवाजी विश्वविद्यालय की परंपरा अनुसार प्र-कुलगुरु डॉ. पाटिल ने सबसे पहले विश्वविद्यालय के प्रांगण में स्थित छत्रपति शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटिल, प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब, डॉ. बापूजी सालुंखे की प्रतिमाओं का अभिवादन किया. इस समय उनकी पत्नी शिल्पा पाटिल, बेटे अखिलेश और आर्यन उपस्थित थे. तत्पश्चात कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के ने डॉ. पाटिल का स्वागत किया. इस समय कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर ने उन्हें पुस्तकें भेंट की. इस समय पदार्थ विज्ञान एवं नैनो साइन्स तथा तकनीक अधिविभाग के छात्र भी उपस्थित थे.